स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं.

**दिनांक :** २४/०४/२०२५ **रोजी झालेल्या** मासिक **सभा बैठकीचे इतिवत्त नोंदवही.**

१) ग्रामपंचायतीचे नांव : हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे

नोंदवही.

२) सभेची वेळ : सकाळी ११ : ३० वा.

४) सभेची तारीख : २४/०४/२०२५

५) सभेचे स्थळ : धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज सभागृह, हिंजवडी

३) सभेचा क्रमांक : ०७

६) सभेचे कोणी मान्यवर अधिकारी हजर असल्यास त्यांची हुद्दयासह नाव :

७) सभेचे अध्यक्ष मान्यवर :– श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर (मा. सरपंच)

दिनांक : २४/०४/२०२५ रोजी मा. श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर (सरपंच) / यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या मासिक बैठक / सभेमधील उपस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सभेस उपस्थित अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा | भ्रमणध्वनी क्रमांक | ई–मेल आयडी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर | सरपंच | | | [signature] |
| २ | सौ. दिपाली शरद जांभुळकर | उपसरपंच | | | [signature] |
| ३ | श्री. विक्रम वसंत साखरे | सदस्य | | | [signature] |
| ४ | श्री. विशाल लक्ष्मण साखरे | सदस्य | | | [signature] |
| ५ | श्री. मयुर राजेंद्र साखरे | सदस्य | | | [signature] |
| ६ | श्री. मच्छिंद्र बबन हुलावळे | सदस्य | | | [signature] |
| ७ | श्री सचिन नामदेव जांभुळकर | | | | [signature] |
| ८ | सौ. ऐश्वर्या प्रशांत वाघमारे | | | | A.P. Waghmare |
| ९ | प्रतिक्षा शिवाजी घोटकुले | | | | Ghotkule |
| १० | वरील प्रमाणे एकूण १७ सभासदांपैकी ९ उपस्थीत होते | | | | |
| ११ | अर्धा तास वाट पाहिली असता (१२ वाजेपर्यंत) | | | | |
| १२ | कोरम पूर्ण न झाल्याने आजची सभा तहकूब | | | | |
| १३ | करण्यात आली. | | | | |
| १४ | | | | | |
| १५ | | | | | |
| १६ | | | | | |
| १७ | | | | | |
| १८ | | | | | |
| १९ | | | | | |

[signature] [signature]

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं. 01

तालुका ........................ जिल्हा ........................

(शिक्का: ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे)

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | आज दि. २१/०४/२०२५ रोजी बोलविण्यात आलेल्या तहकुब मासिक सभेस खालील प्रमाणे सभासद उपस्थित आहेत. | |
| | | १. श्री. गणेश बन्सीलाल जांभुळकर सरपंच | (सही) |
| | | २. श्री. दिपाली शरद जांभुळकर उपसरपंच | गैरहजर |
| | | ३. श्री. मयुर राजेंद्र साखरे सदस्य | (सही) |
| | | ४. सौ. मनिषा जयसिंग हुलावळे सदस्या | M.J.Hulawale |
| | | ५. सौ. ऐश्वर्या प्रशांत वाघमारे सदस्या | A.P.Waghmare |
| | | ६. सौ. पल्लवी सचिन गंगावणे सदस्या | Pallavi |
| | | एकुण सदस्य संख्या - १७, हजर सदस्य संख्या - ०५<br>गैरहजर सदस्य संख्या - १२ | |
| | | (सही) (सही)<br>ग्रामपंचायत अधिकारी सरपंच<br>ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे | |
| | | येणेप्रमाणे सभासद हजर झालेनंतर तहकुब मासिक सभा असल्याने कोरमची आवश्यकता नसल्याने सभेचे कामकाज चालू करण्यात यावे असे अध्यक्ष सो यांनी सांगीतले असता कामकाज चालू करण्यात आले ते पुढीलप्रमाणे. | |
| १ | | मागील मासिक सभेचे कामकाजाचे प्रोसेडींग वाचुन कायम करणे. | |
| | १ | ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील मासिक सभेत ग्रामपंचायतीची मागील मासिक सभा दि. २५/०३/२०२५ रोजीचे कामकाजाचे प्रोसेडींग सविस्तरपणे वाचन करण्यात आले व त्यावर साधक-बाधक चर्चा करण्यात येवून मागील मासिक सभेचे कामकाजाचे प्रोसेडींग वाचुन | |

# इतिवृत्त नोंदवही

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

ग्रामपंचायत ..........

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | सर्वानुमते कायम करणेत आले. | |
| | | सुचक: मा. अध्यक्ष सो | |
| | | ठराव सर्वानुमते मंजुर | |
| २ | | माहे मार्च सन २०२५च्या मासिक जमा खर्चास मंजुरी देणे. | |
| | २ | ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील मासिक सभेत ग्रामपंचायतीचे माहे मार्च सन २०२४ च्या झालेल्या जनरल, पाणीपुरवठा, १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग यांचे मासिक जमा खर्चाचे वाचन करण्यात आले ते पुढीलप्रमाणे. | |
| | | जनरल जमा खर्च माहे मार्च सन २०२४-२५ | |

| जमा | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | नियमभंग दंड | ३००००.०० | १ | चेक कमिशन | ३७४२.०० |
| २ | घरपट्टी | १५६७५०८७.०० | २ | जी. एस. टी. भरणा | १३१७०५.०० |
| ३ | आरोग्य कर | ११६५१०.०० | ३ | कामगार कल्याण निधी | २६९०३.०० |
| ४ | वीज कर | ११६५१०.०० | ४ | कुटुंब कल्याण सेवा (कचरा व्यवस्थापन) | ३००६७६८.०० |
| ५ | नोटीस फी | ६४९०३७.०० | ५ | भूमिगत गटर | ३४०८३०७.०० |
| ६ | दंड | ९५९२८४.०० | ६ | ऑफीस फर्निचर | ३९०९१४३.०० |
| ७ | दाखला फी | ३६७०.०० | ७ | स्ट्रीट लाईट | १८७९२८.०० |
| ८ | व्याज | १३७३५०.०० | ८ | पथ दिवाबत्ती साहित्य व इतर | ११४४२३६.०० |
| ९ | बयाणा रक्कम | ७९४१७२.०० | ९ | कर्मचारी पगार | २१७५३५८.०० |
| १० | जन्म मृत्यू विलंब फी | १०.०० | १० | कर्मचारी प्रा. फंड | ६२६३९२.०० |

स्टार सोल्युशन ॲण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी, जि. पुणे

तालुका ................ जिल्हा ................

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | | | | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ११ | नजरचुकीने जनरल खात्यात जमा झालेली पाणीपट्टी | ३९६००.०० | ११ | कर्मचारी विमा | ११२८८.०० |
| | | १२ | निविदा फी | १००३०.०० | १२ | कर्मचारी व्यवसाय कर | १७६००.०० |
| | | १३ | भाडे जमा | ४८०००.०० | १३ | संगणक | ५३४०६६.०० |
| | | १४ | लोकवर्गणी | ११०३८५१.०० | १४ | विद्युत देयके | ३१४६२०.०० |
| | | १५ | ज्यादा जमा | ६.४९ | १५ | १०% म.बा.क. | ४८०१४७.०० |
| | | १६ | चेक कमिशन परत | ६००.०० | १६ | कचरा वाहन देखभाल दुरुस्ती | ३५१४३.०० |
| | | १७ | डबल घरपट्टी जमा | ४८३९९.०० | १७ | ऑफिस सादील | ९५४६३.०० |
| | | | | | १८ | जंतुनाशक औषध फवारणी | १२०४२४.०० |
| | | | | | १९ | नवीन न.पा.पु. लाईन | ३२१९०९४.०० |
| | | | | | २० | नजरचुकीने जमा झालेली पाणीपट्टी जनरल खातेकडून न.पा.पु. खातेकडे वर्ग | ३९६००.०० |
| | | | | | २१ | ५% दिव्यांग निधी | ४८११८३३.०० |
| | | | | | २२ | सुरक्षा ठेव परत | २८८७००.०० |
| | | | | | २३ | सार्वजनिक उद्याने व देखभाल | ७०१०.०० |
| | | | | | २४ | नवीन रस्ते निर्मिती | ४२९९८८१.०० |
| | | | | | २५ | वकील फी | १०००००.०० |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

ग्रामपंचायत ..........................................

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | | | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | २६ | पेव्हिंग ब्लॉक | २९०४४१६.०० |
| | | | २७ | विविध विकास कामे | ६०२१४७४.०० |
| | | | २८ | निविदा जाहिरात | ४१२००.०० |
| | | | २९ | आरोग्य साहीत | १४४००.०० |
| | | | ३० | जी.एस.टी. भरणा १५ वा वित्त आयोग | ८२६८०.०० |
| | | | ३१ | आयकर भरणा १५ वा वित्त आयोग | ४५७९८.०० |
| | | | ३२ | १५%. मागासवर्गीय निधी | १३८६४४११.०० |
| | | | ३३ | रुग्णवाहिका इंधन व दुरुस्ती | ३९७००.०० |
| | | | ३४ | १५ वा वित्त आयोग कामगार कल्याण निधी | ३६०७.०० |
| | | | ३५ | सी ए फी | ३६०००.०० |
| | | | ३६ | डबल जमा झालेली घरपट्टी परत | ४८३९९.०० |
| | | | ३७ | जागा खरेदी | १,३४९८२००.०० |
| | | | ३८ | सैनिकांना मिळकत करात सूट | ४८२६४.०० |
| | | एकुण जमा | १९७३२११६.४९ | एकुण खर्च | ६७३०७५००.०० |
| | | आरंभीची शिल्लक | ७३४३२१०३.५१ | अखेरची शिल्लक | २५८५६७२०.०० |
| | | एकुण एकंदर | ९३१६४२२०.०० | एकुण एकंदर | ९३१६४२२०.०० |

स्टार सोल्युशन ॲण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही



तालुका ........................ जिल्हा ........................

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|

पाणीपुरवठा जमा खर्च माहे मार्च सन २०२४-२५

| जमा | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | व्याज | १०७४२.०० | १ | एम.आय.डी.सी. पाणीबील | ७३७८१९.०० |
| २ | पाणीपट्टी | ३६०६१६.०० | २ | कर्मचारी पगार | ३०००७४.०० |
| ३ | नोटीस फी | १३१६४.०० | ३ | कर्मचारी प्रा.फंड | ९१०३२.०० |
| ४ | आर. ओ. प्लांट सामान्य पाणीपट्टी | ११२००.०० | ४ | कर्मचारी विमा | १०२०.०० |
| ५ | नजरचुकीने जमा झालेली पाणीपट्टी जनरल खातेकडून न.पा.पु. खातेकडे वर्ग | ३९६००.०० | ५ | कर्मचारी व्यवसाय कर | २४००.०० |
| ६ | चेक परत | ८२६६२७.०० | ६ | पाणीपुरवठा देखभाल खर्च | १८९०५१.०० |
| ७ | ज्यादा जमा | ४.४८ | ७ | जंतुनाशक टी.सी.एल. | ४९३२४.०० |
| एकूण जमा | | १२६१९५३.४८ | एकूण खर्च | | १३७०७२०.०० |
| आरंभीची शिल्लक | | २०४५५७२.५२ | अखेरची शिल्लक | | १९३६८०६.०० |
| एकूण एकंदर | | ३३०७५२६.०० | एकूण एकंदर | | ३३०७५२६.०० |

१४ वा वित्त आयोग जमा खर्च माहे मार्च सन २०२४-२५

| जमा | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | व्याज | २६.१९ | १ | साहित्य खरेदी | ४०३०.०० |
| | | | २ | आरोग्य सादिल | २२७.०० |
| एकूण जमा | | २६.१९ | एकूण खर्च | | ४२५७.०० |
| आरंभीची शिल्लक | | ४२३०.८१ | अखेरची शिल्लक | | ०-०० |
| एकूण एकंदर | | ४२५७.०० | एकूण एकंदर | | ४२५७.०० |

स्टार सोल्युशन ॲण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं.

ग्रामपंचायत ........................................

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|

१५ वा वित्त आयोग जमा खर्च माहे मार्च सन २०२४-२५

| जमा | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | व्याज | १७१८००.०० | १ | नळ पाणीपुरवठा वीज बील भरणे सन २०२४-२५ | १५८७६०.०० |
| | | | २ | विविध विकास कामांचा आयकर भरणा | ४७२२४.०० |
| | | | ३ | प्लास्टिक बंदीसाठी गावातील लोकांना कापडी पिशवी वाटप करणे (सन २०२३-२४ अबंधित निधी) | १४७२८६.०० |
| | | | ४ | विविध विकास कामांचा जी.एस.टी. भरणा | ७९२९४.०० |
| | | | ५ | अ.जा.अ.ज.मध्ये कापडी पिशवी वाटप करणे (सन २०२४-२५ बंधित निधी) | २९०८९९.०० |
| | | | ६ | मागासवर्गीय वस्ती सुशोभिकरण करणे (सन २०२१-२२ बंधित निधी) | ३७५६०.०० |
| | | | ७ | अंगणवाडी साठी वजन काटे | ९९९९८.०० |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी, जि. पुणे

तालुका ........................ जिल्हा ........................

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | खरेदी करणे (सन २०२४-२५ अबंधित निधी) | |
| | | ८ अ.जा.अ.ज.वस्ती मध्ये कचरा वर्गीकरण डबे बसविणे (सन २०२४-२५ बांधीत निधी) | ३२२११८.०० |
| | | ९ गावातील महिला व मुलींना विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे (सन २०२४-२५ अबांधीत निधी) | ९२१२०.०० |
| | | १० किशोरवयीन मुलींना व्यवसाय प्रशिक्षण व साहित्य पुरविणे (सन २०२२-२३ अबांधित निधी) | २४५०००.०० |
| | | ११ महिलांसाठी कापडी पिशवी शिवणे प्रशिक्षण व साहित्य पुरविणे (सन २०२०-२१ बंधित निधी) | ९८०००.०० |
| | | १२ अंगणवाडी केंद्राला पुर्व प्राथमिक शिक्षण साहित्य उपलब्ध करून देणे | ९८४२८.०० |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं.

ग्रामपंचायत ..........

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | (सन २०२२-२३ अबांधित निधी) | |
| | | १३ अ.जा.अ.ज. वस्तीमध्ये पाण्याचीसोय करणे (२०२२-२३ अबांधित निधी) | २४१५२६.०० |
| | | १४ महिला बचत गटाचे उत्पादन करिता बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व व्यवस्था करणे (सन २०२२-२३ अबांधित निधी | १०५१६१.०० |
| | | १५ अंगणवाडी कुपोषित मुलांना आहार पुरविणे (सन-२०२२-२३ अबंधित निधी) | ९७९३२.०० |
| | | १६ ग्रा.पं. पाणीसाठा टाक्यांची देखभाल करणे व निर्जंतु-कीकरण करणे सन २०२४-२५ बंधित निधी | १४९८४९.०० |
| | | १७ शालेय विद्यार्थ्यांना खेळाचे व शैक्षणिक साहित्य पुरविणे (सन | १९६८६४.०० |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८१४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे

तालुका ........ जिल्हा ........

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | | | | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २०२२-२३ बांधित निधी) | |
| | | | | १८ | ग्रा.पं. मधील ग्रंथालयात पुस्तके खरेदी करणे (सन २०२४-२५ अबंधित निधी) | ९९७५०.०० |
| | | | | १९ | शाळेसाठी खेळाचे साहित्य पुरविणे (सन २०२४-२५ अबंधित निधी) | ४०९११०.०० |
| | | | | २० | गावातील बचत गटातील महिलांना व्यवसायासाठी साहित्य देणे व सहकार्य करणे (सन २०२४-२५ अबंधित निधी) | ५२२०९४.०० |
| | | एकुण जमा | १७१८००.०० | एकुण खर्च | | ३८८६९७३.०० |
| | | आरंभीची शिल्लक | १७५४७०२८.०० | अखेरची शिल्लक | | १३८३१८५५.०० |
| | | एकुण एकंदर | १७७१८८२८.०० | एकुण एकंदर | | १७७१८८२८.०० |

वरीलप्रमाणे माहे मार्च सन २०२५ च्या वरील सर्व खात्यांच्या मासिक जमा खर्चाचे वाचन करण्यात आले त्यावर चर्चा करण्यात आले त्यावर चर्चा करण्यात येऊन जमा खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सुचक : मा. अध्यक्ष सो.

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही



ग्रामपंचायत .................

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | ठराव सर्वानुमते मंजूर. | |
| ३ | | माहे मार्च सन २०२५ मधील अ-ब-क-ड. नोंदीचे वाचन करणे. | |
| | ३ | ग्रामपंचायत हिंजवडी ता.मुळशी, जि.पुणे, येथील मासिक सभेत माहे मार्च सन २०२५ मधील जन्म-मृत्यू-विवाह-उपजत मृत्यू नोंदीचे वाचन करण्यात आले ते पुढीलप्रमाणे. जन्म नोंदी- ८, मृत्यू नोंदी-१०, विवाह नोंदी-०, उपजत मृत्यूनोंद-० येणेप्रमाणे नोंदीचे वाचन करण्यात आले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. | |
| | | सुचक : मा. अध्यक्ष सो. | |
| | | ठराव सर्वानुमते मंजूर | |
| ४ | | माहे-एप्रिल सन २०२५ मधील संभाव्य खर्चास मान्यता देणेबाबत. | |
| | ४ | ग्रामपंचायत हिंजवडी ता.मुळशी, जि.पुणे येथील मासिक सभेत माहे-एप्रिल सन २०२५ मधील संभाव्य खर्चाचे वाचन करण्यात आले ते पुढीलप्रमाणे. | |

| अ. क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नाव/ बिल धारकाचे | संभाव्य खर्च |
|---|---|---|---|
| | ग्रामनिधी | | |
| १ | मौजे हिंजवडी ता.मुळशी, जि.पुणे येथे कार्यक्षेत्रातील हिंजवडी गावातील सर्व रस्त्यांची साफसफाई करण्यासाठी मजुर व मुकादम पुरविणे कामाचे | आरवी एंटरप्रायजेस | ७,००,०००.०० |

स्टार सोल्युशन ॲण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी, जि. पुणे

तालुका ............ जिल्हा ............

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|---|
| | | माहे - मे २०२५ बील | | |
| | | २ ग्रा. पं. हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे हिंजवडी क्षेत्रांतर्गत दैनंदिन घनकचरा व्यवस्थापन (गोळा करणे, वाहतुक करणे व विल्हेवाट लावणे माहे-मे २०२५ कामाचे. | प्रकृती वेस्ट मॅनेजमेन्ट | १६,००,०००.०० |
| | | ३ ग्रा. पं. हिंजवडी हद्दीतील सर्व स्ट्रीट लाईट पथदिव्यांचे माहे-मे २०२५चे वीजबील | एम. एस. ई. डि. सी. एल | ३,००,०००.०० |
| | | ४ ग्रा. पं. हिंजवडी येथील अंगणवाडी, साखरे वस्ती, म्हातोबा टेकडीचे माहे-मे २०२५ विजबील | एम. एस. ई. डि. सी. एल. | ३,०००.०० |
| | | ५ ग्रा. पं. हिंजवडी येथील ग्रा. पं. कार्यालय, महिला सभागृह, लिफ्ट इत्यादींचे माहे-मे २०२५ चे वीजबील. | एम. एस. ई. डि. सी. एल. | ५५,०००.०० |
| | | ६ ग्रा. पं. हिंजवडी येथील वार्ड क्र. ६ मधील हिराई-सिताई मुख्य रस्ता ते राजेंद्र पवार यांचे मिळकती पर्यंत बंदिस्त भुमिगत गटर करणे. | स्वराज्य कंन्स्ट्रक्शन | १९,००,०००.०० |
| | | ७ मौजे हिंजवडी येथील वार्ड क्र. २ मधील एम आय डी सी रस्ता ते रागा हॉटेल कंपाउंड पर्यंत गटार करणे. | स्वराज्य कंन्स्ट्रक्शन | ४०,९०,०००.०० |
| | | ८ मौजे हिंजवडी येथील वार्ड क्र. ६ मधील हिराई-सिताई मुख्य रस्ता ते राजेंद्र कॉंक्रीट रस्ता करणे. | स्वराज्य कंन्स्ट्रक्शन | २६,७०,०००.०० |

# इतिवृत्त नोंदवही

ग्रामपंचायत ..............

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | | | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|---|---|
| | | ८ | ग्रा. पं. हिंजवडी येथे नमुना नं. १ते ३३ दैनंदिन कामकाज साहित्य पुरविणे कामाचे बील | स्टार सोल्युशन ॲण्ड कुदळे एंटरप्रायजेस | ३०,०००.०८ |
| | | १० | मौजे ग्रामपंचायत हिंजवडी मालकीच्या वाहने स्वच्छता/धुणे/सफाई करणे. | आरवी एंटरप्रायजेस | २७,०००.०० |
| | | ११ | मौजे हिंजवडी येथील कॅमेरेंची देखभाल व दुरुस्ती करणे चे बील | स्टार सोल्युशन ॲण्ड कुदळे एंटरप्रायजेस | २,१८,०००.०० |
| | | | पाणीपुरवठा | | |
| | | १ | एमआयडीसी कडुन पुरविण्यात येणाऱ्या पाणी-पुरवठ्याचे माहे मे २०२५चे बील | मा. कार्यकारी अभियंता इ. ॲण्ड एम डिव्हिजन | ७,००,०००.०० |
| | | २ | ग्रा. पं. हिंजवडी हद्दीतील पाणीपुरवठा संबंधित सर्व विजबील माहे मे २०२५ | एम.एस.ई.डि. सी.एल. | ३,००,०००.०० |

तसेच इतर बिले देखील ग्रामपंचायतीस प्राप्त आहेत त्यांचे वाचन करण्यात आले ते पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नाव/ बिल धारकाचे | संभाव्य खर्च |
|---|---|---|---|
| | ग्रामनिधी | | |
| १ | मौजे हिंजवडी वार्ड क्र. ५ मधील म्हातु बाबुराव साखरे यांच्या मिळकतीपर्यंत ड्रेनेज | साईस्नेह इन्फ्रास्ट्रक्चर | ८,८६,४८२.०० |

स्टार सोल्युशन अ‍ॅण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

तालुका ............ जिल्हा ............



| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | | | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | लाईन दुरूस्त करणे. | | |
| | | २ | ग्रा. पं. हिंजवडी कार्यक्षेत्रातील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात विविध ठिकाणीचे सांडपाणी वाहिनी चोकअप दुरूस्तीसाठी चेंबर बांधणे झाकणे बसविणे आरसीसी पाईप टाकणे इत्यादी सर्व सांडपाणी दुरूस्तीचे काम करणे. | साईस्नेह इन्फ्रास्ट्रक्चर | ६,९९,८६८.०० |
| | | ३ | मौजे हिंजवडी येथील वार्ड क्र. ३ मधील ग्रामपंचायत हिंजवडीचे राजमाता जिजाऊ महिला सभागृह येथे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांसाठी चेंजींग रूम व बाथरूम तयार करणे. | एच. टी. जांभुळकर | ९,७१,७७०.०० |
| | | ४ | ग्रा. पं. हिंजवडी येथील विद्युत गॅस शवदाहिनीचे व इलेक्ट्रीक व फरशीचे काम करणे. | एच. टी. जांभुळकर | ९,२०,६८९.०० |
| | | ५ | मौजे हिंजवडी येथील वार्ड क्र. २ मधील श्री म्हातोबा मंदिर परिसरात दगडी ओटा बांधकाम करणे. | एच. टी. जांभुळकर | ९७६५३३.०० |
| | | ६ | मौजे हिंजवडी येथील वार्ड क्र. ३ मधील जि. प. शाळा येथे सुरक्षा जाळी बसविणे. | एच. टी. जांभुळकर | ९,८२,१७४.०० |
| | | ७ | १५ वा वित्त आयोग बंधित निधी सन २०२४-२५ अंतर्गत | एच. टी. जांभुळकर | १,८४,३८१.०० |

स्टार सोल्युशन ॲण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

ग्रामपंचायत ..................

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | | | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामपंचायत जलस्त्रोतांना सुरक्षा जाळी बसविणे. | | |
| | | ८ | मौजे हिंजवडी कार्यक्षेत्रात डेंग्यु / हिवताप / मलेरिया प्रतिबंधात्मक पावसाळी फवारणी करणे कामाचे माहे-मार्च २०२५ चे बील. | स्टार सोल्युशन ॲण्ड कुदळे एंटरप्रायजेस | १,२२,५००.०० |
| | | ९ | पाणंद रस्ता वरील विद्युत जनित्र स्थलांतरित करणे | श्रीनाथ एंटरप्रायजेस | ३,६९,५५५.०० |
| | | १० | भाजी मंडई येथील पाण्याची टाकी करीता आरसीसी डीजाईन पुरविणेचे बील | एस एम कानिटकर | १,०३,२५०.०० |
| | | ११ | ग्रा. पं. हिंजवडी येथील वाहनांना व धुर फवारणी करीता लागणारे इंधन (पेट्रोल / डिझेल) | के. बी. पेट्रोलियम | ६०,३६८.०० |
| | | १२ | ग्रा. पं. हिंजवडी येथील ग्रामसचिवालय इमारत येथील आर ओ प्लॉन्ट येथील वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | एस. के. एंटरप्रायजेस | २,९७,७५८.०० |

वरीलप्रमाणे वाचन केलेल्या माहे-एप्रिल सन २०२५ मधील संभाव्य खर्चास व प्राप्त बिलास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व प्राप्त बिले / मुल्यांकनानुसार वरील अदा करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले व माहे-एप्रिल २०२५ मधील संभाव्य खर्चास मान्यता देणे बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

तालुका ........................ जिल्हा ........................



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | सुचक : मा. अध्यक्ष सो.<br>ठराव सर्वानुमते मंजुर | |
| ५ | | वरीष्ठ कार्यालयातुन आलेल्या पत्रव्यवहारांचे वाचन करणे. | |
| | ५ | ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील मासिक सभेत वरिष्ठ कार्यालयातून आलेल्या पत्रव्यवहारांचे वाचन करण्यात आले ते पुढीलप्रमाणे.<br>१) मा. वैद्यकीय अधिकारी सो, प्राथमिक आरोग्य केंद्र माण यांचे पत्र क्र. प्रा.आ.केंद्र माण/६९/२०२३ दिनांक-२२/०१/२०२५ विषय - ग्रामपंचायत हिंजवडी यांच्या कडून औषधी प्राप्त झाले बाबत.<br>२) मा. गट विकास अधिकारी सो, (वर्ग १) पंचायत समिती मुळशी (पौड) यांचे पत्र जा.क्र. पंस/पंचा/वशी/२१५/२०२५ दिनांक: २६/०३/२०२५ विषय - ग्रामपंचायत हिंजवडी येथील सर्व्हे नं. ७४१/४/२ मधील ८आर जागा खरेदी करणेस परवानगी बाबत.<br>३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो, पुणे जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र जा.क्र. जिप/पंचा-५/२२८/२०२५ पुणे, दिनांक-२४/०३/२०२५ विषय - ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी, जि. पुणे. येथे गट नं. ७४१/४/२ अंतर्गत वाहनतळ व इतर विविध कामांसाठी ०८ आर क्षेत्र जागा खरेदी करण्यास परवानगी देणेबाबत.<br>४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र जा.क्र.जि.प/पंचा/आस्था-१/१५०/२०२५ दि. २८/०३/२०२५ विषय - मा. मुख्यमंत्री यांचे १०० दिवस कृती कार्यक्रम | |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं.

ग्रामपंचायत ..............................

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | अभियान अंतर्गत गुंतवणुक प्रोत्साहन उपक्रमा-<br>बाबत.<br>५) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो, पुणे<br>जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र जा. क्र. जिप/पंचा/<br>आस्था - १२/४८/२०२४ दि. २७/०३/२०२५ विषय-<br>औद्योगिक वसाहती असलेल्या ग्रामपंचायतीनी<br>कारखान्यांची करवसुली करणेसाठी अवलंबण्याची<br>कार्यपद्धती.<br>६) मा. वैद्यकीय अधिकारी सो, प्राथमिक आरोग्य<br>केंद्र माण यांचे पत्र जा. क्र./ प्रा. आ. कें. माण/<br>तांत्रिक/ १२९/२५ दिनांक-०९/०४/२०२५ विषय-<br>हिंजवडी येथील शिवतेज नगर मध्ये आढळून<br>आलेल्या संशयित कॉलरा रूग्ण परिसरातील<br>पाणी नमुने अहवालाबाबत.<br>७) मा. विभागीय आयुक्त सो, पुणे विभाग, पुणे<br>यांचे निकालपत्र क्र. विकास/ ग्रापं/ एसआर-५३/<br>२०२४ दि. १५/०४/२०२५ विषय- श्री. गणेश<br>बन्सीलाल जांभुळकर सदस्य, ग्रामपंचायत<br>हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे विरूद्ध श्री. मयुर<br>राजेंद्र साखरे सदस्य, ग्रामपंचायत हिंजवडी<br>ता. मुळशी, जि. पुणे यांचे महाराष्ट्र ग्रामपंचायत<br>अधिनियम कलम ३९ प्रमाणे निकालपत्र.<br>८) मा. तहसिलदार मुळशी सो, (पौड) यांचे<br>पत्र क्रमांक/ ग्रा. पं./ कावि/ ५४/ २०२५ दिनांक-<br>१७/०४/२०२५ विषय- दिनांक ०५ मार्च २०२५<br>ते ०४ मार्च २०३० या कालावधीत ग्रामपंचायती<br>अनुसुचित क्षेत्र व बिगर अनुसुचित क्षेत्रामधील<br>ग्रामपंचायतीतील सरपंच पदे अनुसुचित<br>जाती, अनुसुचित जमाती, नागरिकांचा<br>मागास प्रवर्ग व स्त्रियासाठी आरक्षित निवडणु- | |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

तालुका ........................ जिल्हा ........................



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | कीसाठी आरक्षण सोडत कार्यक्रम. | |
| | | ९) मा. मंडळ आधिकारी सो माण, ता. मुळशी, जि. पुणे यांचे पत्र जा.क्र. वशी/हिंजवडी/२०३/२०२५ दिनांक- २१/०४/२०२५ विषय- गाव मौजे हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन सर्वे नं. १४९/३ च्या उताऱ्यावरील इतर अधिकारातील निवृत्ती सुदाम नवले विकसन करारनामा शेरा काढणेबाबत. | |
| | | १०) मा. उपविभागीय अधिकारी सो, मावळ-मुळशी उपविभाग पुणे यांचे पत्र क्र.फौज/कावि/१०३२/२०२५ दि. ०४/०४/२०२५ विषय- जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदीचे अहवाल सादर करणेबाबत. | |
| | | ११) मा. गटविकास अधिकारी सो, (वर्ग १) पंचायत समिती मुळशी (पौड) यांचे पत्र जा.क्र. पंस/पंचा/वशी/२४६/२०२५ दि. २१/०४/२०२५ विषय- दि. २४ एप्रिल २०२५ रोजी तालुका व ग्रामपंचायत स्तरावर राष्ट्रीय पंचायत राज दिवस - NRPD साजरा करण्याबाबत. | |
| | | १२) मा. गट विकास अधिकारी सो, (वर्ग १) पंचायत समिती मुळशी (पौड) यांचे पत्र जा.क्र. पंस/पंचा/वशी/२४९/२०२५ दिनांक- २२/०४/२०२५ विषय: दिनांक- २८/०४/२०२५ रोजी आढावा सभा आयोजनाबाबत. | |
| | | १३) मा. गट विकास अधिकारी सो, (वर्ग १) पंचायत समिती मुळशी (पौड) यांचे पत्र जा.क्र. पंस/पंचा/वशी/२५१/२०२५ दिनांक- २२/०४/२०२५ विषय- दि. २४ एप्रिल २०२५ | |

स्टार सोल्युशन ॲण्ड गीता एंन्टरप्रायजेस पिरंगुट, पुणे - ४१२ ११५ मोबा. नं. ९६८९४८८००७/९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

ग्रामपंचायत ..........

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | शेजी तालुका व ग्रामपंचायत स्तरावर राष्ट्रीय पंचायत राज दिवस - NRPD साजरा करण्याबाबत. | |
| | | वरील पत्राप्रमाणे व नियमानुसार त्यांवर कार्यवाही करण्यात यावी असे ठरले व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. | |
| | | सुचक : मा. अध्यक्ष सो | |
| | | ठराव सर्वानुमते मंजुर | |
| ६ | | आलेल्या अर्जाचा विचार करणे. | |
| | ६ | ग्रामपंचायत हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे येथील मासिक सभेत आलेल्या अर्जांचे वाचन करण्यात आले ते पुढीलप्रमाणे. | |
| | | १) श्री. वसंत दत्तात्रय साखरे, प्रणव यशवंत साखरे, सार्थक अरुण साखरे यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र. म ७६६ मध्ये विना हॉस्पिटॅलिटी या नावाने हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट ॲण्ड बार हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |
| | | २) श्री. कृष्णा सैद यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र. म ७८८ मध्ये Curefoods India Pvt Ltd या नावाने Cloud Kitchen हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |
| | | ३) श्री. मदन भैराराम यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र. क ३७८ मध्ये New Chandan | |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

तालुका ........................ जिल्हा ........................ पान नं. 10

ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी, जि. पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | Medico या नावाने Medicine Supply हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |
| | | ४) श्री. बबन जयवंत साखरे यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १००७, १११३, क्र ३४० या मिळकतीवर ग्रामपंचायत हिंजवडीने कधीही तोडकाम कारवाई केलेली नाही असा दाखला मिळणे बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |
| | | ५) श्री. मुंडे कृष्णाजी ज्योतिबा यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र. म ३३१ मध्ये मातोश्री मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स या नावाने मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |
| | | ६) निकीता सुनिल भुजबळ यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र. अ ६५५ मध्ये श्री. म्हातोबा मेडीको या नावाने औषध विक्री हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली | |

स्टार सोल्युशन अँण्ड गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/ ९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

ग्रामपंचायत ........................

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले.<br>७) रचना हॉस्पिटल्स यांचा ग्रामपंचायत हिंजवडी येथील सर्वे नं. ३१/१/२/३/A मध्ये बांधकाम चालु असुन सदर ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मान्यतेसाठी ग्रामपंचायत हिंजवडीची नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केले बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले.<br>८) डिल्ह मेटल इंडिया प्रा.लि. (विनायक तुपे) यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र.म२६ मध्ये डिल्ह मेटल इंडिया प्रा.लि. (प्लाट-१) या नावाने सिक्रोनायझर रिंग हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले.<br>९) डिल्ह मेटल इंडिया प्रा.लि. (विनायक तुपे) यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र.म१६ मध्ये डिल्ह मेटल इंडिया प्रा.लि. (प्लाट-२) या नावाने सिक्रोनायझर रिंग हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

तालुका ............ जिल्हा ............



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अंमलबजावणी |
|---|---|---|---|
| | | १०) सौ. तेजास्विनी संतोष ढवळे यांचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १३९५ मध्ये सरगम रेस्टॉरंट परमिटरूम बार या नावाने रेस्टॉरंट परमिटरूम बार हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |
| | | ११) 7-India Convenience Retail Limited यांचा ग्रामपंचायत मिळकत क्रम १३५ मध्ये 7-India Convenience Retail Limited या नावाने कन्व्हेअन्स स्टोअर आणि सिलबंद बिअर आणि वाईन विक्री हा व्यवसाय करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता घेवून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे ठरले. | |
| | | १२) स्वाती स्वप्नील तित्तर यांचा श्री. स्वप्नील शरद तित्तर शकुंतला शरद तित्तर व शरद विठ्ठल तित्तर यांचे नावावर मौजे हिंजवडी येथील गावात असलेल्या दोन टू. बी. एच. के. फ्लॅटची माहिती मिळणेबाबत यासंदर्भाच्या अर्जाचे वाचन करण्यात आले असता विहित मुदतीत माहिती देण्यात यावी असे ठरले. | |
| | | १३) सौ. चेतन हिरामण साखरे यांचा मौजे हिंजवडी येथील वार्ड क्र. ५ वसंत उत्सव सोसायटी अंतर्गत वाकड रोड बाबतची | |

# इतिवृत्त नोंदवही

स्टार सोल्युशन अँड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९९८९४८००७५/
९९७३७२४६०९

ग्रामपंचायत ..........

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | कागदपत्रे मिळणेबाबत या संदर्भाच्या<br>अर्जाचे वाचन करण्यात आले असता विहित<br>मुदतीत माहिती देण्यात यावी असे ठरले.<br>१४) श्री. रंगनाथ दगडोबा हुलावळे यांचा<br>मौजे हिंजवडी येथील सुरतवाला कॉम्पलेक्स<br>बिस्नेस्पर्क यांची कर आकारणीसाठीचे सर्व<br>कागदपत्रे मिळणेबाबत या संदर्भाच्या अर्जाचे<br>वाचन करण्यात आले असता विहित मुदतीत<br>माहिती देण्यात यावी असे ठरले.<br>१५) श्री. संतोष दत्तु ढवळे व इतर यांचे मौजे<br>हिंजवडी येथील सर्वे क्र. २६१।३।१ मधील<br>कॉंक्रीट रस्ता, भूमिगत गटार, लाईट दिवे<br>व्यवस्था करून मिळणेबाबतच्या अर्जाचे वाचन<br>करण्यात आले असता, ग्रामनिधीतील उपलब्ध<br>निधीनुसार समक्ष पाहणी करून संबंधित जागा<br>मालकाचे संमतीपत्रक घेऊन त्यांची ग्रामपंचायत<br>नमुना नं. २३ नोंद घेऊन रस्ता, ड्रेनेज व स्ट्रीट<br>लाईट अशा कामांची अंदाजपत्रक मागणी<br>करण्यात यावी असे ठरले.<br>१६) मे. एच. टी. जांभुळकर यांचा ग्रा. पं. हिंजवडी<br>ता. मुळशी जि. पुणे भाजी मंडई येथे १५ लक्ष<br>लीटर्स क्षमतेची पाण्याची भूमिगत साठवण<br>टाकी बांधकाम करणे सुधारित अंदाजपत्रक<br>मागणीचे पत्र मिळण्याबाबतचे (ई निविदा<br>सुचना क्र. ७ व कार्यारंभ आदेश क्र. १९८६।<br>२०२३-२४) अर्जाचे वाचन करण्यात आले<br>असता हे काम मे. एच. टी. जांभुळकर यांना<br>प्राप्त झाले आहेत परंतु ज्याठिकाणी काम<br>करावयाचे आहे त्या ठिकाणी तीन बाजूस<br>एम. आय. डी. सी. ची सुरक्षा भिंत एक बाजूस | |

# इतिवृत्त नोंदवही

तालुका ........ जिल्हा ........



| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | श्री- म्हातोबा भाजी मंडईचा भाग येत असल्याने या बाजूंना सुरक्षेच्या कारणास्तव काही ठराविक अंतर सोडून प्रस्तावित टाकीचे काम करणे गरजेचे असलेचे निदर्शनास आले आहे त्यामुळे ७५ लाख लीटर पाण्याची साठवण टाकीची साठवण क्षमता कमी होणार असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले त्याचबरोबर कमी जागेत बांधकाम व खोदाई व इतर काम करावयाचे असल्याने बांधकाम व इतर खर्चात देखील वाढ होणार असल्याने नवीन वस्तुनिहाय (बाब निहाय) नवीन सुधारित अंदाजपत्रकाची मागणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. | |
| | | १७) श्री- गोरख काजु ढवळे यांचे मालकीचे सर्वे क्र- २६१/३/२ ढवळे साखरे वस्ती येथे कॉंक्रीट रस्ता करून मिळण्याबाबतच्या अर्जाचे वाचन करण्यात आले असता ग्रामनिधीतील उपलब्ध निधीनुसार समक्ष पाहणी करून संबंधित जागा मालकांचे संमतीपत्रक घेऊन त्यांची ग्रामपंचायत नमुना नं-२३ नोंद घेऊन कॉंक्रीट रस्त्याचे अंदाजपत्रक मागणी करण्यात यावी असे ठरले. | |
| | | १८) एच-टी-जांभुळकर यांचा ग्रामपंचायत हिंजवडी यांना दिलेले एम-बी मुल्यांकन/जि. परिषद उपविभाग २ यांच्या कडील प्रोसमधील एम-बी-मुल्यांकन तसेच ग्रामपंचायत हिंज-वडीचे पुर्ण झालेली तसेच पुर्ण होणारी विकास कामांचे रक्कमेचे तपशीलचे शिल्लक राहिलेल्या बिल मिळणेबाबतच्या अर्जाचे वाचन केले असता उपलब्ध निधीनुसार देयके अदा | |

ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी, जि. पुणे

स्टार सोल्युशन अँण्ड
गीता एंन्टरप्रायजेस
पिरंगुट, पुणे - ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

ग्रामपंचायत ..............................

पान नं.

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | करणेत यावी असे सर्वानुमते ठरले.<br>१९) हेमंत विठ्ठल नलगे यांचा सैनिकांना मिळकत करात सुट संदर्भातील अर्जाचे वाचन केले असता त्यांनी अर्जासोबत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे यांचे मालमत्ता कर सुट प्रमाणपत्र दि.०७/०४/२०२५ सोबत जोडले आहे. त्याअन्वये व शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.९३ पंरा-४ दि.१८ ऑगस्ट २०२० नुसार त्यांना ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ८७३० मध्ये १००% सवलत देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>२०) श्रीकांत दिलीप जाधव यांचा आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील १५% मागासवर्गीय निधी लाभाबाबत बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर अर्जामध्ये सन २०२४-२५ मधील लाभ मिळणेबाबत मागणी अर्ज केला आहे त्यामध्ये सौर ऊर्जा संच दुरुस्ती व कॉम्प्युटर प्रिंटर मागणी केली आहे. तरी त्यांना सन २०२४-२५ मधील इतर लाभार्थी प्रमाणे रक्कम रुपये २,००,०००/- वैयक्तिक लाभ देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>२१) शैलेंद्र हिरामण जाधव यांचा आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील १५% मागासवर्गीय निधी लाभाबाबत बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर अर्जास मासिक सभा दि.१८/१२/२०२४ ठराव क्र.११६ ने यापुर्वी मंजुरी देण्यात आली होती परंतु कागदपत्रे सादर केली नव्हती त्या कागदपत्राची पुर्तता झाल्याने सन २०२४-२५ मधील प्रती लाभार्थी २,००,०००/- याप्रमाणे वैयक्तिक लाभ देण्यात | |

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | यावा असे सर्वानुमते ठरले.<br>२२) सचिन वसंत सोनवणे यांचा आर्थीक वर्ष २०२४-२५ मधील १५% मागासवर्गीय निधी लाभाबाबत बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर अर्जास मासिक सभा दिनांक: १८/१२/२०२४ ठराव क्र. ११६ ने यापुर्वी मंजुरी देण्यात आली होती परंतु कागदपत्रे सादर केली नव्हती त्या कागदपत्राची पुर्तता झाल्याने सन २०२४-२५ मधील प्रती लाभार्थी-२,००,०००/- याप्रमाणे वैयक्तिक लाभ देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>२३) धनराज नारायण वाघमारे यांचा आर्थीक वर्ष २०२४-२५ मधील १५% मागासवर्गीय निधी लाभाबाबत बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर अर्जामध्ये सन २०२४-२५ मधील लाभ मिळणेबाबत मागणी अर्ज केला आहे त्यामध्ये सौर ऊर्जा संच दुरुस्ती व कंम्प्युटर प्रिंटर मागणी केली तरी त्यांना सन २०२४-२५ मधील इतर लाभार्थी प्रमाणे रक्कम रुपये २,००,०००/- वैयक्तिक लाभ देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>२४) रामदास दिलीप जाधव यांचा आर्थीक वर्ष २०२४-२५ मधील १५% मागासवर्गीय निधी लाभाबाबत बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर अर्जामध्ये सन २०२४-२५ मधील लाभ मिळणेबाबत मागणी अर्ज केला आहे त्यामध्ये सौर ऊर्जा संच दुरुस्ती व कंम्प्युटर प्रिंटर मागणी केली तरी त्यांना सन २०२४-२५ मधील इतर लाभार्थी प्रमाणे रक्कम रुपये २,००,०००/- वैयक्तिक लाभ | |

| स्टार सोल्युशन अँण्ड गीता एंटरप्रायजेस पिरंगुट, पुणे - ४१२ ११५ मोबा. नं. ९६८९४८८००७/ ९६७३७२४६०९ | इतिवृत्त नोंदवही | पान नं. |
|---|---|---|

ग्रामपंचायत ..............................

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>२५) अनिता अजय जाधव यांचा आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील १५% मागासवर्गीय निधी लाभाबाबत बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर अर्जास मासिक सभा दिनांक १८/१२/२०२४ ठराव क्र. ११६ने यापुर्वी मंजुरी देण्यात आली होती परंतु कागदपत्रे सादर केली नव्हती त्या कागदपत्रांची पुर्तता झाल्याने सन २०२४-२५ मधील प्रती लाभार्थी २,००,०००/- याप्रमाणे वैयक्तिक लाभ देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>२६) निलेश किसन जाधव यांचा आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील १५% मागासवर्गीय निधी लाभाबाबत बाबतचे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर अर्जामध्ये सन २०२४-२५ मधील लाभ मिळणेबाबत मागणी अर्ज केला आहे त्यामध्ये सौर ऊर्जा संच दुरुस्ती व कॉम्प्युटर प्रिंटर मागणी केली आहे. तरी त्यांना सन २०२४-२५ मधील इतर लाभार्थी प्रमाणे रक्कम रुपये २,००,०००/- वैयक्तिक लाभ देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>२७) शांताबाई राजू रगोडे यांचा पाणी दर (पाणी पट्टी) सुमारे ७ वर्षापासून मिळाल्याबद्दल विनंती अर्जाचे वाचन करण्यात आले असता, याबाबत नळ कनेक्शनची पाहणी व संबंधित रजिस्टर तपासून कार्यवाही करावी असे ठरले.<br>२८) मनोज रामटेके यांचा Potholes on the hinjawadi main road in phase 2 and phase 3 चे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, संबंधित विभागास याबाबत कळवावे | |

शासन निर्णय क्रमांक : संग्राम २०१४/प्र. क्र. ४३/संग्राम कक्ष दि. २५ जुन २०१४ प्रमाणे प्रत्येक सभेची स्वतंत्र नोंदवही/इतिवृत्त ठेवावी

स्टार सोल्युशन ॲण्ड
गीता एंटरप्रायजेस
पिरंगुट, पुणे – ४१२ ११५
मोबा. नं. ९६८९४८८००७/
९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

तालुका ............ जिल्हा ............



ग्रामपंचायत हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | असे ठरले. | |
| | | २९) दिलीप हुलावळे यांचा नवीन पाणीपुरवठा जोडणीबाबत विनंती अर्जाचे वाचन करण्यात आले असता, ग्रा.पं. पाणीपुरवठा कर्मचारी यांचे मार्फत पाहणी करण्यात येवून सदरच्या ठिकाणी ग्रा.पं. हिंजवडीची नळ पाणीपुरवठा लाईन असून त्यास पाणी येत असल्यास सदरच्या अर्जदाराकडून पाणीपट्टी डिपॉजीट भरून घेवून १ घरगुती नळ कनेक्शन देण्यात यावे असे ठरले. | |
| | | ३०) Green life Society Hinjawadi यांचा Request for urgent action on issues affecting green life society चे वाचन करण्यात आले असता, अर्जदारास समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले. | |
| | | ३१) रोहन प्रथमा यांचा रोहन प्रथमा सोसायटी हिंजवडी फेज १ मधील रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन आणि वाईन शॉप्स बाबत तातडीने कार्यवाही करण्याची विनंती अर्जाचे वाचन करण्यात आले असता, सदर पत्रामध्ये नमुद केलेनुसार १) सोसायटीच्या भागामधील कचऱ्याबाबत ग्रामपंचायतीने दक्षता घेवून यापुढे सदरच्या भागातील कचरा हा एम.आय.डी.सी. व ग्रामपंचायतीकडून उचलणे बाबत कार्यवाही करावी. २) उघड्यावर कचरा जाळणे बाबत ग्रामपंचायतीने प्रतिबंध करावा व उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कार्यवाही करावी. ३) रस्ता दुरुस्तीसाठी रस्त्याची मालकी मा. कार्यकारी अभियंता सो, एम.आय.डी.सी., वाकडेवाडी, पुणे यांची | |

स्टार सोल्युशन अँण्ड गीता एंटरप्रायजेस पिरंगुट, पुणे - ४१२ ११५ मोबा. नं. ९६८९१४८८००७/ ९६७३७२४६०९

# इतिवृत्त नोंदवही

पान नं.

ग्रामपंचायत

| विषय नंबर | ठराव नंबर | सभेपुढे विचारा करीता आलेले विषय व ठराव. | शेरे व तारखेसह ठरावाची अमंलबजावणी |
|---|---|---|---|
| | | असल्याने सदर समस्याबाबत अर्जदाराने सद मा. कार्यकारी अभियंता स्वो. एम.आय. डी.सी. बाळेवाडी, पुणे यांना पत्रव्यवहार करावा असे कळवावे. ४) पत्रात उल्लेख केलेल्या प्रमाणे वाईन शॉपी बाबत माहिती घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे अर्जदारास कळवावे असे ठरले. | |
| | | ३२) अनिता विठ्ठल साखरे, सुप्रिया सोमनाथ साखरे यांचा पाडलेल्या मिळकतीचा कर कमी करणे व नोंद कमी करणे बाबत (घर क्र. १२२०) चे अर्जाचे वाचन करण्यात आले असता, त्यांनी अर्जासोबत बांधकाम पाडले बाबतचे फोटो जोडलेले आहेत तरी ग्रा.पं. कर्मचारी यांचे मार्फत प्रत्यक्ष जागेवर पाहणी करण्यात येऊन नोंद कमी करणे बाबतची कार्यवाही करावी असे ठरले. | |
